रविवार दि. ०७ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अंबडचे तहसीलदार ६.४० लाखांची लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात

## अवैध वाळू उपशावर कारवाई न करण्यासाठी कोट्यवधींच्या व्यवहाराचा आरोप; लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची धडक कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील अंबडचे तहसीलदार विजय लक्ष्मण चव्हाण यांना ६ लाख ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहात पकडल्याने महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे. अवैध वाळू उत्खननावर कारवाई न करणे तसेच सहा हायवा टिप्परना वाळू वाहतुकीसाठी मोकळीक देण्याच्या मोबदल्यात ही लाच मागितल्याचा आरोप आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या माहितीनुसार, ३६ वर्षीय तक्रारदाराने २६ मे २०२६ रोजी बीड येथील एसीबी कार्यालयात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, अंबड तालुक्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्या पोकलेन मशीनवर कारवाई न करण्यासाठी आणि सहा हायवा टिप्परद्वारे सुरू असलेल्या वाळू वाहतुकीत अडथळा आणू नये यासाठी तहसीलदार विजय चव्हाण यांनी मोठ्या रकमेची मागणी केली होती.

**सुरुवातीला १५ लाखांची मागणी**

तक्रारीनुसार, पोकलेन मशीनवर कारवाई न करण्यासाठी दररोज दीड लाख रुपये या प्रमाणे आठ दिवसांसाठी १२ लाख रुपये, तसेच सहा हायवा टिप्परसाठी प्रत्येकी ५० हजार रुपये या प्रमाणे आणखी ३ लाख रुपये अशी एकूण १५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती. यापैकी तक्रारदाराने यापूर्वीच ८ लाख रुपये दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

मात्र उर्वरित रक्कम देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. त्यानंतर एसीबीने तक्रारीची गोपनीय पडताळणी सुरू केली.

**पडताळणीत लाच मागणी स्पष्ट**

दिनांक २६ मे रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणीत तहसीलदार विजय चव्हाण यांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. चर्चेनंतर तडजोडीअंती ६ लाख ४० हजार रुपये स्वीकारण्यास त्यांनी तयारी दर्शविल्याचे एसीबीने म्हटले आहे.

पडताळणीनंतर एसीबीने सापळा रचण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ६ जून २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील कासलीवाल मार्वल सोसायटी परिसरात शासकीय पंचांच्या उपस्थितीत सापळा कारवाई करण्यात आली.

**६.४० लाख रुपये स्वीकारताना ताब्यात**

सापळा कारवाईदरम्यान तहसीलदार विजय चव्हाण यांनी तक्रारदाराकडून ६ लाख ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना तात्काळ ताब्यात घेतले. या कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली असून अंबड तालुक्यातील वाळू व्यवसायाशी संबंधित अनेक प्रश्न पुन्हा चर्चेत आले आहेत.

**अंगझडतीत मोबाईल, दागिने आणि रोकड**

एसीबीने केलेल्या अंगझडतीत आरोपीकडून एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल, ॲपल कंपनीचे घड्याळ, पिवळ्या धातूच्या दोन अंगठ्या, एक लॉकेट आणि ६ हजार ३७० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली. याशिवाय त्यांच्या निवासस्थानी घरझडतीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

**गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू**

या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर शहरातील सातारा पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपी तहसीलदारांचे सक्षम प्राधिकरण महसूल व वन विभागाचे अपर मुख्य सचिव असल्याचे एसीबीने स्पष्ट केले आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक समाधान कवडे यांनी पर्यवेक्षण व तपासाची जबाबदारी सांभाळली. तर पोलीस अधीक्षक माधुरी केदार-कांगणे आणि अपर *(पान २ वर)*

स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

# दुचाकी चोरणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

**२ लाख २५ हजार रुपये किमतीच्या दोन चोरीच्या मोटारसायकली जप्त; बदनापूर येथील गुन्हा उघडकीस**

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर व परिसरात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) सुरू केलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चंदनझिरा परिसरातून एका सराईत वाहनचोरास अटक करून त्याच्याकडून चोरीच्या दोन मोटारसायकली जप्त केल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या वाहनांची एकूण किंमत सुमारे



२ लाख २५ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील मोटारसायकल चोरीच्या घटनांचा तपास सुरू होता. दरम्यान, दिनांक ३ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यात संशयित असलेला मुस्तफा अब्दुल सय्यद हा चंदनझिरा परिसरात फिरत आहे.

माहितीची खातरजमा करून एलसीबीचे पथक तत्काळ चंदनझिरा भागात रवाना झाले. सुंदरनगर परिसरात संशयित एका मोटारसायकलसह आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव मुस्तफा अब्दुल सय्यद (वय २३ वर्षे, रा. चंदनझिरा, जालना) असे सांगितले.

सखोल *(पान २ वर)*

# मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त भाजपा जालना महानगरची नियोजन बैठक संपन्न

**जालना -प्रतिनिधी**

केंद्रातील मोदी सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त ‘‘विश्वास, विकास व जनकल्याण‘‘ या अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्ह्याच्या वतीने जिल्हा नियोजन बैठकीचे आयोजन भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे करण्यात आले. या बैठकीत आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध जनसंपर्क कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. या बैठकीस



प्रदेश संयोजक डॉ. भागवत कराड, मराठवाडा विभाग संयोजक नितीन काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.भागवत कराड यांनी सांगितले की, मोदी सरकारच्या गेल्या १२ वर्षांतील विविध विकासकामांचा आढावा घेतला. पायाभूत सुविधा, गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, शेतकरी हित, सामाजिक न्याय तसेच देशाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. तसेच केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक प्रभावीपणे काम करावे असे हि त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त *(पान २ वर)*

# आयर्नमॅन कैलास झोळगे यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव

**जालना । प्रतिनिधी**

पहिले आयर्नमॅन होण्याचा बहुमान पटकावत जालन्याचे नाव जागतिक पातळीवर झळकवल्याबद्दल आयर्नमॅन कैलास झोळगे यांचा जालन्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला आहे.

जालन्यातील रहिवाशी असलेले कैलास झोळगे यांनी आजपर्यंत राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत जालन्याचे नाव एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. जालन्यातील क्रीडा प्रेमी आणि मित्र परिवाराच्या




पाठबळामुळे कैलास झोळगे यांनी मागील महिन्यात व्हिएतनाम येथे आयोजित अत्यंत कठीण जागतिक आयर्नमॅन १४०.६ मैल स्पर्धेत स्विमिंग ३.८ किमी, सायकलिंग १८० किमी, रनिंग ४२.२ किमी असे सलग २२६ किलो मिटर अंतर १५.२३ तासात यशस्वीरित्या पूर्ण करून आयर्नमॅन किताब पटकावत जालन्याचे नाव जागतिक पातळीवर झळकावले तसेच जालन्याचे पहिले आयर्नमॅन होण्याचा बहुमान प्राप्त केल्यामुळे कैलाश झोळगे यांना जालन्याच्या जिल्हाधिकारी *(पान २ वर)*

आष्टीत गांजाविक्रीवर पोलिसांचा मोठा प्रहार

# २.२४ किलो गांजासह दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

दहशतवाद विरोधी शाखा व आष्टी पोलिसांची संयुक्त कारवाई; १ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अवैध अंमली पदार्थांच्या विरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत दहशतवाद विरोधी शाखा () जालना आणि आष्टी पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्त कारवाई करत गांजाचा साठा करून त्याची चोरट्या मार्गाने विक्री करणाऱ्या एका आरोपीस अटक केली असून, त्याच्याकडून २ किलो २४० ग्रॅम गांजा आणि मोबाईल फोन असा एकूण १ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात



आणखी एका संशयिताचा सहभाग समोर आल्याने त्याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू व अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी जिल्ह्यातील अवैध गांजा विक्री आणि अंमली पदार्थांच्या साखळीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार दहशतवाद विरोधी शाखा आणि आष्टी पोलीस ठाण्याचे पथक गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत होते. दरम्यान, गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, आष्टी येथील इमलिया मोहल्ला परिसरात एक व्यक्ती आपल्या राहत्या घरात गांजाचा साठा करून त्याची अवैधरित्या विक्री करत आहे. या माहितीची पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी तत्काळ छापा टाकला.

छाप्यात पोलिसांनी सोहेल खान युसुफ खान पठाण (वय २७, रा. इमलिया मोहल्ला, आष्टी ता. परतूर) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे सापडलेल्या संशयास्पद पदार्थाची तपासणी केली असता तो गांजा असल्याचे निष्पन्न झाले. चौकशीदरम्यान *(पान २ वर)*

# लेखणीची ताकद दाखवणार; पोलीस आणि गुंडांच्या अभद्र युतीवर पत्रकारांचा एल्गार!

## *उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचा उद्दामपणा; पत्रकार संरक्षण कायदा हे फॅड म्हणणाऱ्या अधिकाऱ्याचा हिशोब चुकता करणार!

## *...तर गुटखा माफियांचे लाड पुरवणाऱ्या चंदनझिरा पोलिसांच्या कर्तव्यावरही असणार नजर; पत्रकारांचा थेट इशारा

**जालना । प्रतिनिधी**

पत्रकारांवर भ्याड हल्ले करून आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या गुंडांना आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या भ्रष्ट पोलीस प्रशासनाला आता त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे. आमच्या हातातील लेखणी ही कोणापुढे झुकण्यासाठी नसून, व्यवस्थेच्या चिंधड्या उडवण्यासाठी आहे. इथून पुढे जिल्ह्यातील पत्रकार गप्प बसणार नाहीत, तर सामूहिक पत्रकारितेच्या माध्यमातून प्रशासनावर पत्रकारांचा दबदबा निर्माण केला जाईल, असा सिंहगर्जना वजा इशारा जिल्ह्यातील तमाम पत्रकारांनी एकमुखाने दिला आहे. पत्रकार संतोष भुतेकर आणि राहुल मुळे यांच्यावर झालेल्या भ्याड आणि जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ आज जिल्ह्यातील संपादक, वार्ताहर आणि प्रतिनिधींची एक वादळी बैठक संपन्न झाली. या बैठकीत उपस्थित पत्रकारांचा संताप अनावर झाला होता. प्रत्येक वक्त्याने आपल्या मनोगतातून पोलीस प्रशासन आणि गुन्हेगारी प्रवृत्तींवर घणाघाती हल्ला चढवला.

**पत्रकार संरक्षण कायदा हे फॅड म्हणणाऱ्या डीवायएसपींचा तीव्र निषेध!**

या बैठकीत ज्येष्ठ पत्रकार लियाकत अली खान यांनी पोलीस प्रशासनाचा अत्यंत संतापजनक चेहरा समोर आणला. दोन दिवसांपूव पत्रकार शिष्टमंडळ जेव्हा उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांना भेटायला गेले आणि आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली, तेव्हा अधिकारी मोबाईलमध्ये व्यस्त होता. पत्रकार आले कशासाठी आले याचे कोणतेही सोयरसुतक अधिकाऱ्यांना नव्हते. त्यांचे वागणे बेजबाबदारपणाचे असल्याचे लियायती अली यांनी यावेळी म्हटले आहे. नव्याने स्थापन होणारी कृती समिती या अधिकाऱ्याला याचा जाब विचारून त्याची मस्ती उतरवणार, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. दुसऱ्या एका घटनेत चंदनझिरा पोलीस ठाण्यात फोनवर बोलतांना तर या अधिकाऱ्यांनी ‘पत्रकार संरक्षण कायदा हे काय फॅड आहे, असे बेजबाबदार वक्तव्य केले. कुलकर्णी यांच्या या वक्तव्यामुळे पत्रकार वर्गात तीव्र संताप असून, ‘हा कायदा जर पत्रकारांसाठी नाही, तर काय तुमच्या बापासाठी आहे? असा जळजळीत सवाल आता उपस्थित केला जात आहे.

गुटखा माफियांचे लाड आणि पत्रकारांना ७ तास डांबणारे चंदनझिरा पोलीस रडारवर!

महिला पत्रकार आयेशा खान यांनी चंदनझिरा पोलीस स्टेशनच्या भ्रष्ट कारभाराचे अक्षरशः वाभाडे काढले. एक पत्रकार जीव धोक्यात घालून पोलिसांना बेकायदेशीर गुटक्यांच्या गाड्या पकडून देतो, मात्र चंदनझिरा पोलीस गुटखा माफियावर कारवाई करण्याऐवजी उलट बातमी देणाऱ्या पत्रकारालाच ७ तास पोलीस ठाण्यात बसवून ठेवतात! हीच का तुमची पोलीसगिरी? असा संतप्त सवाल करत, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची खाकी उतरवण्यासाठी आणि त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यासाठी ही समिती रस्त्यावर उतरेल, असा इशारा त्यांनी दिला. कृती समितीत महिला आणि ग्रामीण भागातील पत्रकारांना सन्मानजनक स्थान देण्याची मागणीही त्यांनी लावून धरली.

**ग्रुप पत्रकारिता आणि लेखणीचा सडेतोड वापर होणार!**

बैठकीत विचार मांडताना विनोद काळे यांनी आक्रमक भूमिका घेतली. पत्रकारांवर आता आंदोलन करण्याची वेळ आली नाही पाहिजे. आपल्या हातातील लेखणी हेच सर्वात मोठे शस्त्र आहे. आता ग्रुप पत्रकारिता करून अशा भ्रष्ट प्रवृत्तींना बातमीच्या माध्यमातूनच जिवंत गाडून प्रशासनावर वचक निर्माण करावा लागेल, असे ते म्हणाले. तर कैलास पुलारी यांनी जिल्हाभरातील पत्रकारांना एका छत्राखाली आणण्यासाठी तातडीने एका प्रभावी पत्रकार कृती समितीची स्थापना करण्याचा प्रस्ताव मांडला, ज्याला सर्वांनी एकमुखाने मंजुरी दिली.

**पोलिसांशी लागेबांधे असणाऱ्यांची गय करणार नाही!**

अच्युत मोरे यांनी अंतर्गत गद्दार आणि पोलिसांचे उंबरठे झिजवणाऱ्या पत्रकारांना थेट इशारा दिला. ‘पोलीस प्रशासन *(पान २ वर)*

# महाराष्ट्राच्या राजकारणाचे कटू-सत्य..?

...एखादी मिठी ही हवीहवीशी असते तर एखाद्या मिठीत जीव गुदमरतो. ही भावना काल्पनिक किंवा भावनिक नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत तीव्र राजकीय वास्तव आहे. महाराष्ट्रात भाजप आणि शिवसेना यांचा संसार फार सुखाने सुरू आहे असे दिसत नाही. दोन्ही पक्ष सत्तेत सोबत आहेत, पण मनाने एकत्र आहेतच असे चित्र नाही. विधान परिषदेच्या जागावाटपांची चर्चा उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होती. हा विषय महाराष्ट्रात सुटू शकला नाही, एवढा ताणला गेला. या मिठीत जीव गुदमरतोय अशी एकंदर भावना शिवसेनेच्या नेत्यांकडून व्यक्त होऊ लागली. शिवसेनेला स्लो पॉयझन दिलं जातंय, असं आता शिवसेनेच्या आमदारांकडून म्हटलं जात आहे. यावरून महाराष्ट्रात भाजपसोबतच्या राजकारणात आता नेत्यांचा जीव गुदमरतोय, हे अत्यंत तीव्र राजकीय वास्तव अधोरेखित होत आहे. २०१४ पासून ते २०२२ च्या सत्तांतरापर्यंत आणि आता २०२६ च्या बदललेल्या राजकीय पटलावर, भाजपसोबतच्या महायुतीत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेची अवस्था केविलवाणी झाली आहे का, त्यांना निर्णयस्वातंत्र्य राहिले नाही का, त्यांना त्यांचे उमेदवार आणि मतदारसंघ ठरवण्याचाही अधिकार महायुतीत उरला नाही, असे वास्तव समोर येत आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या काळात शिवसेना हा महाराष्ट्रात मोठा भाऊ आणि भाजप छोटा भाऊ असे समीकरण होते. मात्र, २०१४ नंतर हे चित्र पूर्णपणे बदलले. महायुतीतील शिवसेनेला आता अस्तित्वाची लढाई लढावी लागत आहे. भाजप हा एक अत्यंत शिस्तबद्ध, विस्तारवादी आणि निवडणूक जिंकणारी मशिनरी असलेला पक्ष आहे. अशा पक्षासोबत जेव्हा एखादा प्रादेशिक पक्ष युती करतो, तेव्हा भाजप त्या पक्षाची जागा हळूहळू व्यापू लागतो. भाजपची राजकीय मिठी ही संबंधित पक्षांना मगरमिठी वाटायला लागते. आपलं मुंडकंच छाटलं जात आहे, एवढी तीव्र भावना जेव्हा नेते व्यक्त करतात तेव्हा त्यांच्या अस्तित्त्वाचाच प्रश्न जटिल झालाय हे लक्षात येतं. भाजपची ही राजकीय मिठी इतकी घट्ट असते की, मित्रपक्षाला स्वतःचा स्वतंत्र विस्तार करण्यास जागाच उरत नाही. शिवसेनेला सतत भाजपच्या सावलीत आणि त्यांच्या रणनीतीनुसारच पावले टाकावी लागत आहेत, ज्यामुळे त्यांचा स्वायत्त श्वास गुदमरल्यासारखा वाटणे स्वाभाविक आहे. विधान परिषदेच्या १७जागांसाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर जिथे ज्यांचे सर्वाधिक मतदार तिथे त्या पक्षाला उमेदवारी हा सोपा फॉर्म्युला जर एकमताने मान्य केला गेला असेल तर मग कोकणची जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला कशी काय दिली जाते? जागावाटप आणि सत्तेचे असमान गणित महायुतीतील भाजपेतर पक्षांच्या नेत्यांना सोडवणे कठीण झाले आहे. महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्रीपद भाजपकडे आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीचे उपमुख्यमंत्री असले तरी सत्तेच्या खऱ्या चाव्या आणि पडद्यामागील निर्णयप्रक्रिया भाजपच्याच हातात राहिली आहे. प्रत्येक लहान-मोठ्या निर्णयासाठी, मंत्रिमंडळ विस्तारासाठी किंवा जागावाटपाच्या सूत्रासाठी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या मंजुरीची वाट पाहावी लागते. दिल्लीश्वरांच्या दर्शनाशिवाय सन्माननीय तोडगा निघत नाही. तडजोड झाली तरी ती अडचणीची तडजोड असते. लोकसभा, विधानसभा निवडणुकांच्या जागावाटपात शिवसेनेला आपल्या हक्काच्या जागांवर पाणी सोडावे लागले किंवा भाजपच्या दबावामुळे उमेदवार बदलावे लागले. ही परिस्थिती म्हणजेच मिठीत जीव गुदमरण्याची स्पष्ट लक्षणे आहेत. ही स्थिती फक्त शिंदेंच्या शिवसेनेची आहे असे नाही तर राष्ट्रवादी काँग्रेसची परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही.

नगरपालिका, महापालिकेपासून राज्यात आणि केंद्रात सत्ता असूनही निर्णय प्रक्रियेत सत्तेतील दोन्ही कनिष्ठ भावंडांना अधिकाधिक दुय्यम स्थान दिले जात आहे. हे राज्याचे सर्वोच्च पद भुषवलेल्या नेत्यांना सहन करावे लागत आहे. ते फक्त सत्तेचा आधार कमी होऊ नये म्हणून. पुण्याची जागा राष्ट्रवादीला हवी होती. येथे त्यांच्याकडे अनेक उमेदवार होते, मात्र भाजपमधून एक बडे कुटुंब राष्ट्रवादीत येतं आणि त्या कुटुंबातील मुलाला एका रात्रीतून उमेदवारी दिली जाते. हे कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेतृत्त्वाला सहजासहजी मान्य होईल असे नाही, पण महाराष्ट्र हे घडताना पाहात आहे. आयाराम, गयाराम यांना सध्या सुगीचे दिवस आले आहेत. राजकीय पक्षांना त्यांच्या आजी-माजी आमदार, खासदार, मंत्र्यांना सांभाळणे कठीण झाले आहे, तिथे कार्यकर्त्यांची दखल घेण्यासही फुरसत आहे का, हा प्रश्नच आहे. एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांना भाजपची मिठी आता मजबुरी वाटायला लागली का? भाजपसोबत राहणे ही शिंदेंच्या शिवसेनेची एक अटळ मजबुरी झाली आहे. सध्याच्या स्थितीत शिवसेनेचा दम नक्कीच गुदमरतो आहे, कारण त्यांना स्वतःच्या अटींवर राजकारण करता येत नाही. मात्र, या मिठीतून बाहेर पडणे त्यांच्यासाठी तितकेच धोक्याचे आहे, कारण बाहेर पडल्यास अस्तित्वाचा संघर्ष अधिक तीव्र होऊ शकतो. थोडक्यात सांगायचे तर, ही एक अशी राजकीय मिठी आहे जी सुखावह नाही, पण ती सोडणेही आत्मघातकी ठरू शकते. म्हणूनच, सध्याची शिवसेना या मिठीत गुदमरत असली, तरी सत्तेच्या ऑक्सिजनवर स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहे, हेच महाराष्ट्राच्या राजकारणाचे आजचे कटू सत्य आहे.



**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर.**

## संपादकीय...

# प्रशासनाची दारे खुली राहतील का?

जालना महानगरपालिकेच्या आयुक्तांनी नागरिकांच्या भेटीगाठींसाठी आठवड्यातील केवळ तीन दिवस आणि त्यातही मर्यादित वेळ निश्चित केल्याच्या निर्णयाने शहरात चर्चा आणि वादाला तोंड फुटले आहे. या निर्णयाविरोधात शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली असून, नागरिकांच्या प्रश्नांपासून प्रशासन दूर जात असल्याचा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर प्रश्न केवळ एका आदेशाचा नाही, तर लोकशाही व्यवस्थेतील प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवादाच्या स्वरूपाचा आहे.

कोणत्याही शहराचा विकास हा केवळ रस्ते, इमारती किंवा योजनांवर अवलंबून नसतो; तो प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर आणि जनतेशी असलेल्या संवादावरही अवलंबून असतो. महानगरपालिका ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असलेली संस्था आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज, रस्ते, मालमत्ता कर, बांधकाम परवानग्या, आरोग्य सुविधा अशा असंख्य प्रश्नांसाठी नागरिकांना महापालिकेची दारे ठोठवावी लागतात. अशा वेळी सर्वोच्च प्रशासकीय अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचण्याची संधी मर्यादित करणे योग्य आहे का, हा रास्त प्रश्न उपस्थित होतो.

दुसरीकडे प्रशासनाचाही विचार करणे आवश्यक आहे. आयुक्त हे केवळ नागरिकांच्या भेटीगाठींसाठीच नसून, विकासकामांचे नियोजन, आर्थिक व्यवहार, विविध विभागांचे समन्वय, शासनाच्या योजनांची अंमलबजावणी आणि न्यायालयीन प्रकरणे अशा अनेक जबाबदाऱ्यांमध्ये गुंतलेले असतात. त्यामुळे कामकाज अधिक शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध करण्यासाठी भेटीची वेळ निश्चित करणे हा प्रशासनाचा अधिकार आहे. अनेक कार्यालयांमध्ये अशी व्यवस्था अस्तित्वात आहे.

मात्र प्रश्न वेळ निश्चित करण्याचा नसून, त्या वेळेची पुरेशी उपलब्धता आणि नागरिकांच्या सोयीचा आहे. शहरातील हजारो नागरिकांच्या समस्या लक्षात घेता आठवड्यातील केवळ तीन दिवस आणि मर्यादित कालावधी हा अपुरा ठरू शकतो. विशेषतः दूरवरून येणाऱ्या नागरिकांसाठी ही व्यवस्था त्रासदायक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यातून प्रशासन आणि राजकारण यांच्यातील संघर्षाचा मुद्दा निर्माण करण्याऐवजी तो नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने सोडविण्याची गरज आहे. नागरिकांना भेटण्यासाठी अधिक वेळ उपलब्ध करून देणे, ऑनलाइन तक्रार निवारण प्रणाली प्रभावी करणे, विभागप्रमुखांना अधिक अधिकार देणे आणि तक्रारींच्या निपटाऱ्यासाठी निश्चित कालमर्यादा लागू करणे यासारखे पर्याय प्रशासनासमोर उपलब्ध आहेत.

लोकशाहीत प्रशासनाची दारे बंद नसतात, पण ती केवळ औपचारिकपणे उघडी असून चालत नाहीत. सामान्य नागरिकाला आपल्या प्रश्नासाठी प्रशासनापर्यंत सहज पोहोचता आले पाहिजे. त्याचवेळी प्रशासनालाही कार्यक्षमतेसाठी आवश्यक शिस्त राखण्याचा अधिकार आहे. त्यामुळे या वादाचे समाधान संघर्षात नसून संवादात आहे.

जालना महानगरपालिकेने नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन या निर्णयाचा पुनर्विचार करावा, तर राजकीय पक्षांनीही या विषयाकडे केवळ राजकीय संधी म्हणून नव्हे तर लोकहिताच्या दृष्टिकोनातून पाहावे. कारण शेवटी प्रश्न कोण जिंकतो याचा नाही, तर नागरिकांच्या अडचणी कितपत कमी होतात याचा आहे.

## प्रवाशांना पळवणाऱ्यांना चाप..!

### सुरक्षा पथकाच्या अचानक धाडीने खाजगी वाहतूकदारांची पळापळ



बदलता महाराष्ट्र वृत्तसेवा

भोकरदन (प्रतिनिधी) - भोकरदन बसस्थानक परिसरात अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात राज्य परिवहन महामंडळाने शनिवारी (दि. ६ जून) मोठी धडक मोहीम राबवत खाजगी वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईमुळे बसस्थानक परिसरात अवैध वाहतूक करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली असून प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. आगार व्यवस्थापक रणजितसिंग राजपूत यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा व दक्षता अधिकारी रविंद्र जाधव, सुरक्षा निरीक्षक सज्जनसिंग जारवाल, पोलीस कर्मचारी योगेश गवळी, तसेच वाहतूक नियंत्रक जी. जी. पालकर, एन. बी. वाघ आणि बारोटे यांच्या पथकाने बसस्थानक परिसरात अचानक तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान बसस्थानकाच्या आवारात अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहनांची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करत दंड वसूल करण्यात आला. बसस्थानक परिसरात काही खाजगी वाहनधारक प्रवाशांना जबरदस्तीने आपल्या वाहनांमध्ये बसवत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाचे आर्थिक नुकसान होत असतानाच प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत वरिष्ठ स्तरावर तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली. कारवाईनंतर संबंधित वाहनधारकांना कडक इशारा देण्यात आला असून, भविष्यात बसस्थानकाच्या आवारात अवैध प्रवासी वाहतूक करताना आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले. या धडक मोहिमेमुळे बसस्थानक परिसरातील अवैध वाहतुकीला मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत असून, प्रवाशांनी एसटी प्रशासनाच्या कारवाईचे स्वागत केले आहे.

## पान १ व ४ वरुन....

### अंबडचे तहसीलदार...

पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कारवाई पार पडली.

**भ्रष्टाचाराविरोधात एसीबीचे आवाहन**

कोणत्याही शासकीय कामासाठी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाचेची मागणी होत असल्यास नागरिकांनी तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन एसीबीने केले आहे. तक्रारींसाठी टोल फ्री क्रमांक १०६४ तसेच व्हॉट्सॲप क्रमांक ९२७०२२१०६४ उपलब्ध करून देण्यात आला आहे.

### लेखणीची ताकद...

उघडपणे पत्रकारांच्या विरोधात काम करत आहे. जे पत्रकार पोलिसांशी लागेबांधे ठेवून आहेत, त्यांनी आता संबंधित अधिकाऱ्यांची कानउघडणी करावी, अन्यथा त्यांची गय केली जाणार नाही,‘ असे सांगत त्यांनी मीट द प्रेस सुरू करण्याचे आवाहन केले.

सात दशकांचा अनुभव पाठीशी, लढाईत शेवटपर्यंत सोबत - अंकुशराव देशमुख (आप्पा)

गेल्या ७० वर्षांपासून पत्रकारितेत भीष्माचार्यासारखे उभे असलेले ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख (आप्पा) यांनी या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध केला. ते म्हणाले, सत्ता, संपत्ती आणि राजकारणी कायम टिकत नाहीत. आपण आपली पत्रकारिता काळाच्या अनुरूप बदलली पाहिजे. भुतेकर आणि मुळे यांच्यावरील हल्ला हा संपूर्ण पत्रकारितेवर झालेला हल्ला आहे. मी या लढाईत तुमच्यासोबत कायम उभा आहे.

या बैठकीला अंकुशआप्पा देशमुख, भरत मानकर, विष्णू कदम, संतोष भुतेकर, नरेश श्रीपत, गणेश जाधव, लियाकत आली खान, शेख चाँद पी. जे., सुरेश कवडे, सुयोग खर्डेकर, शेख सलीम, शिवाजी बावणे, आकाश माने, कैलास फुलारी, दिपक शेळके, आमेर खान, ओमप्रकाश शिंदे, भगवान साबळे, शेख मुजिबोद्दीन, मिर्झा इम्रानबेग, मुजहिद शेख, सुहास वैद्य, संजय बी. शेलकर, विनोद काळे, आयेशा खान, विद्या जाधव, शेख महेजबीन, निकिता काळे, राम अवघड, लहु गाढे, दिपक ढोले, सय्यद इलियास, कादरी हुसैन, युवराज कुरिल, दर्पण जैन, रविकांत दानम, सदानंद देशमुख, अतुल पडूळ, अर्पण गोयल, घनशाम पि. देवकते, बालाजी अडियाल, अभयकुमार यादव, धनसिंग सुर्यवंशी, अच्युत मोरे, दिपक नाटअडान, नरेंद्र जोगड, दिनेश नंद, प्रदीप जाधव, श्रीधर कापसे, महेश सारनीकर, राजेंद्र गायकवाड, ज्ञानेश्वर साळुंके, नजीर गनी शेख, ॲड्. अकरम खान, अशपाक पटेल, सुनिल भारती, शेख अजहर, जावेद खान, विलास गायकवाड, सुनिल खरात, शंकर चेडे, महेश ढेंबरे, दत्ता जाधव, शरद सोनटक्के, शेख नबी सिपोराकर, शेख तारेख, बालासाहेब खडेकर, मनोज गरदास, रवि शिंदे, यांच्यासह जालना शहर व जिल्ह्यातील पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

थोडक्यात काय तर, या बैठकीनंतर जिल्ह्यातील पत्रकार आता बचावात्मक पवित्रा सोडून थेट आक्रमक भूमिकेत आले असून, पोलीस आणि गुंडांच्या युतीचे धाबे दणाणले आहेत!

**रणशिंग फुंकले! कृति समितीत लढवय्या पत्रकारांचा समावेश**

जिल्ह्यातील या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आणि पोलिसांना धडा शिकवण्यासाठी पत्रकार कृती समिती स्थापन करण्यात येत असून, यामध्ये कैलास फुलारी, रविकांत दानम, दिपक शेळके, राजेश भालेराव, लियकत खान, शेख फारूख, भरत मानकर, आयेशा खान मुलानी, संतोष भुतेकर, विद्या जाधव, मैजबिन शेख, अभय यादव, अच्युत मोरे, शेख नजिर गणी, नरेंद्र जोगड, गणेश जाधव, ओ. के. शिंदे, सुहास वैद्य, ज्ञानेश्वर सोळंके, बालाजी अडियाल, दिपक नाटभजन यांचा समावेश आहे.

### दुचाकी चोरणारा...

चौकशीदरम्यान त्याने ताब्यातील मोटारसायकल ही बदनापूर येथील गेवराई बाजार फाटा परिसरातून चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी दोन पंचांच्या उपस्थितीत वाहन जप्त केले. पुढील चौकशीत आरोपीकडून आणखी एक चोरीची मोटारसायकल हस्तगत करण्यात आली.

**जप्त मुद्देमाल**

पोलिसांनी आरोपीकडून खालील चोरीची वाहने जप्त केली आहेत :बजाज पल्सर १५० (काळी-लाल रंग) अंदाजे किंमत : ₹७५,००० रॉयल एनफिल्ड क्लासिक ३५० (काळी रंग) अंदाजे किंमत : ₹१,५०,००० अशा प्रकारे एकूण ₹२,२५,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**गुन्हा उघडकीस**

या कारवाईमुळे पोलीस ठाणे बदनापूर गुन्हा क्रमांक ३०९/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता () अंतर्गत दाखल असलेल्या दुचाकी चोरीच्या गुन्ह्याचा छडा लागला असून आरोपीसह जप्त मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी बदनापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक खामगळ, पोलीस उपनिरीक्षक वाघ, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पव्हरे, कांबळे, पोलीस हेडकॉन्स्टेबल राठोड, वाघ, आडेप, चेके तसेच पोलीस कर्मचारी सागर बावस्कर व स्थानिक गुन्हे शाखेच्या इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

**वाहनचोरांवर पोलिसांचा वचक**

स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे वाहनचोरांच्या टोळ्यांमध्ये खळबळ उडाली असून जिल्ह्यातील इतर दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांमध्ये आरोपीचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत. चोरीच्या वाहनांच्या विक्री व खरेदीच्या साखळीचाही तपास सुरू असून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

### मोदी सरकारच्या १२...

जालना महानगर जिल्ह्यात विविध जनसंपर्क कार्यक्रम, सामाजिक उपक्रम तसेच मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण अभियान राबविण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या विकासकामांची व जनकल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते सक्रियपणे सहभागी होतील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, विजय कामड, सोपान पेंढारकर, युवानेते अक्षय गोरंटयाल, नारायण पवार, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, वसंत शिंदे, शिवप्रकाश चितळकर, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, रमेश गौरक्षक, नगरसेविका संध्या देठे, सखुबाई पणबिसरे, रिमा खरात, संतोष माधवले, कल्याण भदनेकर, शिवराज नारियलवाले, अनिल सरकटे, सतीश केळकर, सुभाष सले, सिद्धेश्वर हाजबे, दुर्गेश कुरील, सुमित सुरडकर, राजाराम जाधव, रोषण चौधरी, सोमेश काबलिये, विकास कदम, रोहित भूरेवाल, मनोजकुमार जोशी, विष्णू डोंगरे, संजय भगत, करण निकाळजे, कैलास सोळुंके, दत्ता जाधव, मुकेश चव्हाण, गुलाब पणबिसरे, सुदर्शन काळे, गणेश जल्लेवार, रोहित खोडवे, नानासाहेब देव्हडे, गौरव गोधेकर, उमेश पेंढारकर आदींची उपस्थिती होती.

बैठकीनंतर ‘‘एक झाड आईच्या नावाने‘‘ या अभियानांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वृक्षारोपणात सहभाग नोंदविला.

### आयर्नमॅन कैलास...

श्रीमती आशिमा मित्तल यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी परिविक्षाधीन आयएएस अधिकारी रंगमंजु आर., अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल,भूसंपादन विभागाच्या उपजिल्हाधिकारी मनीषा देशपांडे, तहसीलदार श्रीमती छाया पवार, नायब तहसीलदार विक्रांत मोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, या गौरवाबद्दल आयर्नमॅन कैलास झोळगे यांच्यावर जालन्यातील क्रीडा प्रेमी आणि मित्र परिवाराकडून अभिनंदन.

### २.२४ किलो गांजासह...

सोहेल खान याने सदर गांजा सिद्धार्थ ज्ञानेश्वर जाधव (वय २८, रा. आष्टी) याच्याकडून खरेदी केल्याची माहिती पोलिसांना दिली. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पोलिसांनी आरोपीकडून खालील मुद्देमाल जप्त केला आहे

२ किलो २४० ग्रॅम गांजा अंदाजे किंमत ₹५६,००० सॅमसंग एस-२३ अल्ट्रा मोबाईल फोन अंदाजे किंमत ₹५०,००० अशा प्रकारे एकूण ₹१,०६,००० किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल या प्रकरणी पोलीस ठाणे आष्टी येथे गुन्हा क्रमांक १४६/२०२६ नोंद करण्यात आला असून, आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायदा कलम 20(B)(ii)(C) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून गांजाचा पुरवठा नेमका कुठून होत होता, याचा शोध घेण्यात येत असून या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास सुरू आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश खटकळ, गणेश सुरवसे, पोलीस उपनिरीक्षक अजित चाटे, दहशतवाद विरोधी शाखेचे मोराती शिवरकर, पोहेकॉ विनोद गडधे, कैलास कुरेवाड तसेच आष्टी पोलीस ठाण्याचे शाम गायके, राणा पांढरे, दीपक पवार, भरत ढाकणे, डिगांगर बादाडे, अविनाश चव्हाण आणि विनोद वाघमारे यांनी सहभाग घेतला. अंमली पदार्थांविरोधात पोलिसांची मोहीम तीव्र जालना जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री आणि तस्करी रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने मोहीम अधिक तीव्र केली असून, अशा अवैध व्यवसायात सहभागी असणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. या कारवाईमुळे आष्टी परिसरातील गांजा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, पोलिसांच्या पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सिद्धार्थ महाविद्यालयाच्या...

कर्मचारी बंधु-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा.अनिल वैद्य यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद हिवराळे यांनी केले.

### शिवराज्याभिषेक दिन...

करण्यात आला. मिलिंद सावंत यांनी देखिल मनागत व्यक्त केले. शाहिर बाबु सेवा राठोड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर सुंदर पोवाडा सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितीचे आभार शैलेंद्र बदनापुरकर यांनी मानले. सुधाकर भालेराव,पांडूरंग काळे,कैलासचंद्र सराफ,बद्रीप्रसाद सोनी,वैभव गरदास,विजय खिल्लारे,सोपान सरनाईक, संजय शिमरे, कुणाल सेवलीकार,अभिजिता शेंडगे,रेणुका गुलापेल्ली यासह वाचक वर्ग उपस्थित होता.

### टेंभुर्णीचा अर्जुनची...

प्रतिष्ठानच्या अध्यक्षांनी व्यक्त केली. या सत्काराला सुनील जोशी, शिवाजी जोशी, आनंद आढावे, लव जोशी, विशाल पैठणे, तानाजी जोशी, ज्ञानेश्वर मैद यांच्यासह शेकडो ग्रामस्थ हजर होते. आपला अर्जुन आता फौजी अर्जुन झाला, हीच भावना प्रत्येकाच्या तोंडी होती.

### राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय...

प्रकार असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले.

यावेळी देवगिरी इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका प्रा. गायत्री सोरटी वेदांत सोरटी , युवसेना गड़किल्ले संवर्धन कक्ष मराठवाड़ा अध्यक्ष किरण राजे देशमुख, जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष तथा मराठवाडा विभाग प्रमुख भूषण यादव, सचिव प्रा. डॉ. नितीन भक्त, महिला प्रशिक्षण प्रमुख प्रतीक्षा दब्बडवार, राजाराम भाऊ शिंदे,ओम पाटिल,सुरेश म्हस्के पाटिल यश रवि, राष्ट्रीय पंच प्रेरणा जरींग, उषा पवार, सत्यम गायकवाड, दीपाली कुलकर्णी, सतीश जाधव, निवांत नंदाने, शिवशम्भु आरती समिति जालना ,पालक, खेळाडू व शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ‘‘शिवरायांचे शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा हीच आमची प्रेरणा असून भारतीय पारंपरिक युद्धकलेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा आमचा संकल्प आहे,‘‘ असा निर्धार यावेळी उपस्थित सिलंबम योद्ध्यांनी व्यक्त केला.

# गरज आहे अशा अधिकाऱ्यांची..

महाराष्ट्रातील प्रामाणिक, कडक शिस्तीचे आणि धडाकेबाज सनदी अधिकारी () तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची गरज आज संपूर्ण प्रशासनाला आहे, ही भावना सर्वसामान्य जनतेच्या मनात तीव्रपणे निर्माण झाली आहे. आपल्या २१ वर्षांच्या कारकिर्दीत तब्बल २५ वेळा बदली होऊनही त्यांनी भ्रष्टाचाराविरोधात आणि नियमांच्या अंमलबजावणीसाठी घेतलेली ठाम भूमिका हेच त्यांच्या लोकप्रियतेचे मुख्य कारण आहे.
राजकीय दबावाला बळी न पडण्याच्या आणि कठोर कार्यशैलीमुळे त्यांची सरासरी दर वर्षाला बदली झाली आहे.

प्रशासनात आणि समाजात त्यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची गरज का वाटते ?, याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत:-
कडक शिस्त आणि पारदर्शकता, नियम पाळण्यावर भर आहे. राजकीय किंवा सामाजिक दबावाला बळी न पडता ते केवळ कायद्याच्या चौकटीत राहून काम करतात.
भ्रष्टाचाराला आळा घालणे हे महत्त्वाचे काम प्राधान्याने करतात. ते ज्या विभागात जातात, तिथली भ्रष्ट साखळी मोडून काढतात आणि पारदर्शकता आणतात. सर्वसामान्यांचे हित आणि जनसामान्यांचा पाठिंबा जनतेचे प्रश्न सोडवणे हेच त्यांचे कार्य वैशिष्ट्य आहे.

नागपूर व नाशिक महानगरपालिका आयुक्त किंवा दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव असताना त्यांनी थेट सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतले.
लोकांचा विश्वास संपादक केला. त्यांच्या प्रामाणिकपणामुळे सामान्य जनता त्यांच्या बदलीविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करते, जे सहसा सनदी अधिकाऱ्यांच्या बाबतीत पाहायला मिळत नाही. किंवा क्वचितच पाहायला मिळते.
धडाकेबाज आणि तत्पर कार्यपद्धती त्वरित निर्णय घेतात. नुकतीच त्यांची अन्न व औषध प्रशासन () आयुक्तपदी बदली झाली आहे. पदभार स्वीकारताच त्यांनी भेसळखोर, बेकायदेशीर गुटखा आणि असुरक्षित अन्नपदार्थ विक्रेत्यांवर धडक छापे टाकून धडक मोहीम सुरू केली आहे. चुकीचे काम करणाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारण्याची त्यांची शैली प्रशासनात वचक निर्माण करते.सार्वजनिक व्यवस्थेचा चेहरा बदलण्यासाठी आणि लोकशाहीत कायद्याचे राज्य खऱ्या अर्थाने टिकवण्यासाठी अशा निर्भीड आणि तडफदार अधिकाऱ्यांची गरज नेहमीच व्यक्त केली जाते. अन्न व औषध प्रशासन () आयुक्तपदाचा पदभार स्वीकारताच आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी राज्यभरात सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र ही विशेष मोहीम सुरू केली आहे. ''जनतेच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही,'' असा कडक इशारा देत त्यांनी अवघ्या काही दिवसांत संपूर्ण राज्यातील भेसळखोर आणि बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणून सोडले आहेत. मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासनाने () केलेल्या धडक कारवायां खालीलप्रमाणे आहेत:-

राज्यव्यापी धडक मोहीम आणि मोठी जप्तीधडक छापेमारी: २५ मे ते ३१ मे दरम्यान राबवलेल्या अवघ्या ६ ते ७ दिवसांच्या मोहिमेत राज्यभरात २०३ पेक्षा जास्त ठिकाणी छापे टाकण्यात आले.कोट्यवधींचा माल जप्त केला. या कारवाईत १ कोटी ५८ लाख २८ हजार रुपयांचा प्रतिबंधित आणि भेसळयुक्त अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.कठोर कायदेशीर पावले उचलून अन्न सुरक्षा कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी तब्बल १०२ आरोपींना थेट अटक करण्यात आली असून ६८ हून अधिक बेकायदेशीर आस्थापने आणि हॉटेल्स पूर्णपणे सील (टाळे ठोकण्यात) करण्यात आली आहेत.जालन्यात १९०० लिटर १३ लाख रुपयांचे भेसळयुक्त तूप जप्त केले. मुंबईत १५




लाखाचे केमिकल फवारा मारून पिकवलेले आंबे जप्त केले.

गुटखा, तंबाखू आणि अन्न भेसळीवर मोठा प्रहार करून भेसळयुक्त अन्नपदार्थांवर बंदी: रसायने आणि स्प्रे मारून कृत्रिमरीत्या पिकवलेले आंबे, निकृष्ट दर्जाचे तूप, भेसळयुक्त खवा, दुग्धजन्य पदार्थ, मिठाई आणि आरोग्याला घातक रंग वापरलेल्या खाद्यपदार्थांवर मोठी कारवाई करण्यात आली.
गुटखा आणि पानमसाला जप्ती: धुळे,जळगाव,मुक्ताईनगर, पाचोरा,जालना, भिवंडी, पुणे, सातारा आणि मुंबईसह अनेक जिल्ह्यांमध्ये कोट्यवधी रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, मिठाई, खाद्यपदार्थ जप्त करून अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. औषध विक्रेते आणि थेट क्लिनिकवर छापेमारी करून, भ्रामक जाहिरातींवर कारवाई - गंभीर आजारांवर हमखास आणि चमत्कारिक उपचारांचे दावे करून नागरिकांची दिशाभूल करणाऱ्या आयुर्वेदिक व इतर औषध उत्पादकांवर औषधे व जादूटोणादी कायदा १९५४ अंतर्गत कारवाई करत ७३ लाखांहून अधिकचा साठा जप्त केला.
विनापरवाना क्लिनिकवर धाड: नागपुरातील एका मोठ्या त्वचा आणि केस प्रत्यारोपण (   ) क्लिनिकवर थेट धाड टाकून, विनापरवाना अवैध औषधविक्री करणाऱ्यांचा पर्दाफाश केला आणि लाखो रुपयांची औषधे जप्त केली.

भेसळयुक्त दूध, तूप, खवा, लस्सी, पनीर, आरोग्यास हानिकारक असलेला कृत्रिम रंग टाकून तळलेले वाटाणे,असा कोटी रक्कम असलेला खाद्यपदार्थाचा साठा जप्त करण्यात आला.

आता सेलिब्रिटी आणि ब्रँड्सही रडारवर आहेत. तुकाराम मुंढेंनी केवळ स्थानिक उत्पादकांवरच नाही, तर टी.व्ही आणि वृत्तपत्रांमध्ये ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या अवास्तव जाहिरातींमध्ये झळकणाऱ्या मोठमोठ्या स्टार्स आणि सेलिब्रिटींना (ब्रँड ॲम्बेसेडर) थेट कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.अशा या वेगवान आणि तडजोड न करणाऱ्या कार्यपद्धतीमुळे पुन्हा एकदा प्रशासकीय वर्तुळात मुंढे पॅटर्नची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.
तुकाराम मुंढे यांच्यासारख्या प्रामाणिक, शिस्तप्रिय आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची आजच्या प्रशासकीय व्यवस्थेत अत्यंत गरज आहे, ही भावना बहुतांश सर्वसामान्य नागरिकांच्या मनात आहे. आपल्या २१ वर्षांच्या प्रशासकीय कारकिर्दीत २५ पेक्षा जास्त बदल्या होऊनही त्यांनी आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही, त्यामुळेच त्यांना जनतेचे प्रचंड समर्थन मिळते. शिक्षण विभाग, सहकार, महसूल, परिवहन, आदिवासी, व ईतर अनेक विभागात तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची गरज आहे अशी भावना व्यक्त केली जात आहे.
भ्रष्टाचाराला आळा, वाळू माफिया, अवैध धंदे आणि कंत्राटदारांची युती तोडण्यासाठी अशा अधिकाऱ्यांची मोठी मदत होते.
प्रशासकीय शिस्त, सरकारी कर्मचाऱ्यांची कामावरील अनुपस्थिती रोखणे, फाईल्स वेळेत क्लिअर करणे आणि कामात पारदर्शकता आणणे यात ते नेहमीच यशस्वी राहिले आहेत. निडर निर्णयक्षमता, राजकीय दबावाला बळी न पडता, केवळ नियमात बसणारे आणि लोकहिताचे निर्णय घेण्याची त्यांची धमक वाखाणण्याजोगी आहे. थेट जनतेशी संवाद साधून त्यांच्या समस्या सोडवल्यामुळे सामान्य माणसाचा सरकारी व्यवस्थेवरील विश्वास वाढतो.

तुकाराम मुंडे आयुक्त झाल्यापासून राज्यभर भेसळमाफीयांना धडकी भरण्याची वेळ आलीय, म्हणून प्रत्येक विभागात एक तरी तुकाराम हवाच..! असा जनतेत सूर दिसतोय.
वर्षानुवर्षे कायदे तेच होते, नियम तेच होते, खुर्च्याही त्याच होत्या...मग विभागातील अधिकारी काय करत होते.?



फरक फक्त ईच्छाशक्ती असणाऱ्या एका माणसाचा होता ! अधिकारी खूप येतात जातात. पण प्रामाणिक पणे काम करण्याची त्यांची मानसिकता हवी.ती अतिशय कमी अधिकाऱ्यांमध्ये असते. आजही प्रशासनात हजारो प्रामाणिकपणे काम करणारे अधिकारी आहेत. परंतु नियम आणि काटेकोरपणे आणला तर व्यवस्थेच्या विरोधात जाणारे म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. त्यामुळे कुठल्याही कारवाईच्या संदर्भात ते जपून किंवा घाबरून असतात. अप्रत्यक्षपणे त्यांच्यावर दबावच असतो. अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनीधींशी जुळवून घ्यावे आणि लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांशी जुळवून घ्यावे, त्यांच्या कलाप्रमाणे वागावे निर्णय घ्यावे हाच प्रकार वर्षानुवर्ष व्यवस्थेमध्ये सुरू आहे.

आज महाराष्ट्र ज्या नावाची चर्चा करतोय, ते नाव म्हणजे तुकाराम मुंडे. कारणही तसंच आहे... राज्याच्या प्रत्येक तालुक्यात प्रत्येक जिल्ह्यात बेधडकपणे कारवाई सुरू झाली. जिथं तिथं कारवाईचा ''मुंडे पॅटर्न'' राबवला जातोय. मग यापूर्वी हा विभाग अस्तित्वात नव्हता का? का इच्छा शक्तीच नव्हती? का राजकीय दबाव होता? हाच प्रश्न निर्माण होतोय.. दूधात भेसळ, दह्यात भेसळ, लस्सीत भेसळ, पनीरमध्ये भेसळ... अन्नपदार्थात भेसळ,तेलात भेसळ,गुळात सुद्धा भेसळ,हे लोक आणखी किती दिवस आपल्या ताटात विष वाढणार होते ? असा प्रश्न जनता उपस्थित करत आहे.
ज्यांनी पैशासाठी लोकांच्या आरोग्याशी खेळ केला, त्यांचे काळे धंदे आता उघडे होत आहे. या माणसाने थेट कारवाई दाखवून दिली.ती पुर्णत्वास जावी हीच भावना व्यक्त होताना दिसत आहे.

व्यवस्थेत बदल घडवून आणायचा असेल तर अशा एका तुकाराम मुंडे सारख्या अधिकाऱ्याची ची गरज असते. २१ वर्षात २५ वेळा बदल्या झाल्या पण हा माणूस कायद्यावर बोट ठेवून वाटचाल करत आहे.

जनतेच्या आयुष्यात विष कालवून स्वतःची संपत्ती वाढवणाऱ्यांचा भ्रष्ट भेसळखोरांना आणि दुसऱ्यांच्या जीवावर उठणाऱ्यांचा हिशोब कधीतरी होतच असतो.
आज आपण परिस्थिती बघतो जो तो लोकप्रतिनिधी आपल्या मर्जीतल्या प्रशासकीय अधिकाऱ्याची आपल्या भागात नेमणूक होईल असे पाहत असतो किंवा करून घेत असतो. कशा साठी.? सगळ्यांना महित असून सुद्धा अनुत्तरीत प्रश्न आहे.

हे सर्व प्रकार आजच घडलेले नाहीत. भेसळीचे जाळे एका दिवसात किंवा एका आठवड्यात उभे राहीलेले नाही. इतकी वर्षे हे उद्योग सुरू असताना संबंधित यंत्रणा काय करत होती? तपासणी होत नव्हती का? तक्रारी नव्हत्या का? का जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात होते?
जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे, पण त्याचबरोबर निष्क्रियता, हलगर्जीपणा किंवा संभाव्य संगनमत यांचीही चौकशी झाली पाहिजे. कारण दोषी फक्त भेसळ करणारेच नसतात; वेळेवर कारवाई न करणारेही तितकेच जबाबदार असतात. ज्यांनी ज्यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले नाही, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

---

# अनुजा सहाई यांच्या ' आर्टिक्युलेट विथ अनुजा' मध्ये स्वामी अभेदानंद यांच्यासोबत अध्यात्मिक चिंतनाचा सुरेल प्रवास




मन, संगीत आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवणाऱ्या आर्टिक्युलेट विथ अनुजा या पॉडकास्टमध्ये गायिका-अभिनेत्री अनुजा सहाई यांनी चिन्मय मिशन दक्षिण आफ्रिका चे निवासी आचार्य आणि आध्यात्मिक प्रमुख स्वामी अभेदानंद यांचे स्वागत केले. दै भास्कर प्रस्तुत या विशेष भागाने प्रेक्षकांना आत्मशोध, शांतता आणि जीवनाच्या खऱ्या अर्थाचा वेध घेण्याची संधी दिली. गायन, अभिनय आणि सर्जनशील अभिव्यक्तीच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या अनुजा सहाई या बजवा शहनाई, पायल, मुंडा यांसारख्या लोकप्रिय गीतांसाठी ओळखल्या जातात. तेलुगू चित्रपटसृष्टीत प्लेबॅक सिंगर म्हणून त्यांना पहिली संधी मिळाली होती, जिथे त्यांचे नाव सुप्रसिद्ध गायिका सुनिधी चौहान यांच्यासोबत जोडले गेले. संगीत, अभिनय आणि अर्थपूर्ण संवाद यांचा समतोल साधत त्यांनी स्वतःचा स्वतंत्र प्रवास घडवला आहे. या विशेष संवादात स्वामी अभेदानंद यांनी अध्यात्म, अंतर्मनाची शांतता, आत्मजाणीव, जीवनाचा उद्देश, नातेसंबंध आणि आधुनिक जीवनात प्राचीन ज्ञानाचे महत्त्व यांसारख्या विषयांवर सखोल विचार मांडले. आजच्या धकाधकीच्या आणि सतत विचलित करणाऱ्या जगात स्वतःशी पुन्हा एकदा जोडले जाण्याचा मार्ग त्यांनी अत्यंत साध्या आणि प्रभावी शब्दांत उलगडून सांगितला. स्वामी अभेदानंद यांनी सांगितले की अध्यात्म म्हणजे केवळ पूजा, विधी किंवा बाह्य आचरण नव्हे. ती स्वतःला अधिक खोलवर समजून घेण्याची, जीवनाकडे अधिक करुणा, स्पष्टता आणि विवेकाने पाहण्याची एक अंतर्मुख यात्रा आहे. या अनुभवाविषयी बोलताना अनुजा सहाई म्हणाल्या, ''एक कलाकार म्हणून मला नेहमीच वाटते की संगीत, सर्जनशीलता आणि अध्यात्म हे एकमेकांशी अतूटपणे जोडलेले आहेत. स्वामी अभेदानंद यांच्यासोबतचा हा संवाद माझ्यासाठी अत्यंत समृद्ध करणारा अनुभव ठरला. त्यांच्या साधेपणात आणि विचारांमध्ये जीवन समजून घेण्याची एक विलक्षण ताकद आहे. च्या माध्यमातून लोकांना विचार करायला, आत्मपरीक्षण करायला आणि स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवायला प्रेरणा देणारे संवाद घडवण्याचा माझा प्रयत्न आहे.'' आर्टिक्युलेट विथ अनुजा हा केवळ एक पॉडकास्ट नसून विविध क्षेत्रांतील प्रेरणादायी व्यक्तींशी होणाऱ्या अर्थपूर्ण संवादांचा एक प्रवास आहे. ''जागरूक राहा! स्पष्टवक्ते राहा!'' या ब्रीदवाक्याला अनुसरून हा मंच प्रेक्षकांना विचार, ज्ञान आणि प्रेरणेची नवी दिशा देण्याचा प्रयत्न करतो. स्वामी अभेदानंद यांचा हा भाग जगभरातील श्रोत्यांना अंतर्मनाशी संवाद साधण्याची प्रेरणा देणारा ठरणार आहे. जीवन अधिक सजग, संतुलित आणि अर्थपूर्ण कसे जगावे याचे सुंदर मार्गदर्शन या संवादातून मिळते. अध्यात्माच्या सुरेल स्पर्शाने मन समृद्ध करणारा हा भाग प्रत्येकाने अनुभवावा असा आहे.

**छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई**

---

देवस्थान इनाम कायदा स्थगित केल्याबद्दल महसूलमंत्र्यांचे आभार!

# महाराष्ट्र मंदिर महासंघ, अष्टविनायक मंदिरे, विश्व हिंदु परिषद व मंदिर विश्वस्त यांच्या लढ्याला मोठे यश!

राज्याचे महसूलमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपूर येथे 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप २०२६' हा प्रस्तावित कायदा स्थगित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. या मंदिरहितैषी निर्णयाचे आम्ही मनः पूर्वक स्वागत करतो. या कायद्याच्या संदर्भात मंदिर विश्वस्तांच्या बाजूने राज्यभर मंदिर विश्वस्त बैठकीत अभ्यासपूर्ण विषय मांडून, पत्रकार परिषदा, देवस्थान भूमी संरक्षण परिषदा घेऊन शासनाला सकारात्मक निर्णय घेण्यास दिशा देणाऱ्या 'महाराष्ट्र मंदिर महासंघ', 'अष्टविनायक मंदिर समिती', 'विश्व हिंदु परिषद' आणि राज्यभरातील समस्त मंदिर विश्वस्तांचे आम्ही जाहीर अभिनंदन करतो. हा निर्णय म्हणजे सर्व मंदिर विश्वस्त आणि समस्त हिंदुत्ववादी संघटनांच्या संघटित लढ्याला आणि प्रयत्नांना आलेले मोठे यश आहे, असे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे संघटक श्री. सुनील घनवट यांनी म्हटले आहे. महसूलमंत्र्यांनी मांडलेल्या सूत्रांवर मंदिर महासंघाची भूमिका मांडताना श्री. सुनील घनवट म्हणाले की, देवस्थानच्या इनाम जमिनी पुन्हा मंदिरांना परत मिळवून देणे, वक्फ बोर्डाप्रमाणे सरकारकडून तेथील अतिक्रमणे काढून देणे, न्यायालयीन लढ्यासाठी नामांकित वकिलांचा सल्ला घेणे, आणि १००-२०० वर्षांच्या जुन्या वहिवाटींबाबत मंदिरांचे नुकसान न होऊ देता जवळपासच्या परिसरात समान मूल्याचा भूखंड मंदिराला देण्याची बंधनकारक तरतूद करणे, हे महसूलमंत्र्यांचे निर्णय अत्यंत स्वागतार्ह आणि मंदिर हिताचे आहेत. यासोबतच १५ ऑगस्टपर्यंतच्या सुनावणी प्रक्रियेसाठी स्थापन होणाऱ्या अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) यांच्या १५ सदस्यीय समितीत देवस्थान प्रतिनिधींना स्थान देण्याच्या भूमिकेचे आम्ही स्वागत करतो.
शासनाने मंदिर हिताचे अनेक निर्णय घेतले असले, तरी हिंदू मंदिरांच्या सर्वांगीण रक्षणासाठी आमच्या मंदिर विश्वस्तांच्या ठरावातील अत्यंत महत्त्वाच्या विषयांचा या नव्या प्रक्रियेत आणि कायद्यात समावेश व्हावा, अशी आमची आग्रही मागणी आहे. भक्तांनी अर्पण केलेला निधी केवळ हिंदू धर्माचा प्रचार-प्रसार, मंदिरांचा जीर्णोद्धार आणि हिंदू समाजाच्या धार्मिक गरजांसाठीच वापरला जावा; तो कोणत्याही निधर्मी किंवा सरकारी योजनांवर खर्च केला जाऊ नये. राजकीय लागेबांध्यांतून मंदिरांचा निधी वापरला जाणे थांबले पाहिजे. राज्यातील लहान व उपेक्षित मंदिरांच्या पुनर्बांधणीसाठी मोठ्या मंदिरांतील निधीचा सुयोग्य वापर व्हावा आणि खेड्यापाड्यात निरलसपणे देवाची सेवा करणाऱ्या गुरव, पुजारी, पुरोहित आणि इतर सेवेकऱ्यांसाठी दरमहा किमान १०,००० ते १५,००० रुपये निर्वाह निधी सुरू करण्यात यावा.

**सुनील घनवट,**
**राष्ट्रीय संघटक, मंदिर महासंघ.**
**(संपर्क क्र.: ७०२०३८३२६४)**

---

# अधिक मासानिमित्त पेंढारे परिवारात लेक-जावयाच्या कौतुकाचा सोहळा

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील पेंढारे परिवारात धोंड्याच्या जेवणाची धूम टेंभुर्णीत: सध्या सुरू आहे पवित्र अधिक ज्येष्ठ मासाच्या निमित्ताने टेंभुर्णी शहरासह ग्रामीण भागात कौटुंबिक उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. या पवित्र महिन्यात लाडकी लेक आणि जावयाचे विशेष आदरातिथ्य करण्याची जुनी परंपरा असून, टेंभुर्णीत सध्या धोंड्याच्या जेवणाची मोठी लगबग सुरू आहे.हिंदू धर्मशास्त्रानुसार अधिक मासात जावयाला भगवान विष्णूचे रूप



मानले जाते. या निमित्ताने जावयाला माहेरी आमंत्रित करून पारंपरिक पद्धतीने तयार केलेले ३३ पुरणाचे धोंडे आणि पंचपक्वान्नाचे जेवण दिले जात आहे. तांब्याच्या ताटात हे धोंडे ठेवून जावयाला विशेष वाण (भेट) देण्याची लगबग माता-पित्यांमध्ये दिसून येत आहे.
सोहळ्यादरम्यान केवळ परिवारानेच लेकीचे लाड केले नाहीत, तर विवाहित लेकीनेही आपल्या माहेरी येऊन आई-वडिलांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तिने आईला साडी-खण देऊन तिची ओटी भरली पेंढारे परिवारातील या कौटुंबिक सोहळ्यामुळे घरातील वातावरण अतिशय आनंदमयी आणि आध्यात्मिक बनले होते.
पेंढारे परिवाराचा सोहळा टेंभुर्णी गावात चर्चेचा ठरला आहे

# भगवान बुद्धांचा धम्म हा विज्ञानावर आधारित आहे!

**दत्ता देशमुख**

तक्षशीला बहुउद्देशीय संस्थेमध्ये श्रमनेर संघाला उपदेश करतांना दारोकार गुरुजी म्हणाले की, तथागतांनी समाजाला विज्ञानाचा धम्म दिला. शांतीचा उपदेश देऊन अहिंसेचा मार्ग नाकारला. राग,लोभ,मत्सर हे माणसाचे शत्रू आहेत. यापासून दूर राहण्यासाठी विपश्यांना प्रत्येक व्यक्तीने करायलाच पाहिजे.ज्यामुळे स्वतःच्या मनावर आपण ताबा ठेवू शकतो. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष



राजेश सदावर्ते, अरुण वाघमारे भारतीय बौद्ध महासभेचे कोशाध्यक्ष, कर्नल कुणाल दहिवले, महादेव वाव्हळ (भारतीय बौद्ध महासभा ) संदीप इंगोले,तक्षशिला बुद्ध विहाराचे अध्यक्ष भिकाजी साळवे, प्रमोद गायकवाड मारुती गायकवाड, चंद्रकांत वाघमारे, अशोक गंगावणे, मीनाताई शरणागत, सुप्रिया बगळे, ज्योती मगरे, महेश शिंदे, राहुल वाकडे उपस्थित होते. सर्व उपासक व उपासिका उपस्थित होते.

**जाफराबाद आगार, आता स्मार्ट होणार**

# प्रदूषणमुक्त आणि वातानुकूलित प्रवासाची सुविधा लवकरच होणार लोकार्पण, चार वातानुकूलित बस डेपो मध्ये दाखल

**दत्ता देशमुख**

जाफराबाद बस आगारात प्रवाशांच्या सोयीसाठी चार नव्या वातानुकूलित इलेक्ट्रिक बसेस (ई-बसेस) दाखल झाल्या आहेत. गेल्या सहा महिन्यांपासून आगारात ई-बसेससाठी आवश्यक असलेल्या चार्जिंग स्टेशनचे काम सुरू होते. हे काम पूर्णत्वास गेल्यानंतर आता या बसेस आगारात उपलब्ध झाल्या असून, जाफराबाद आगाराने पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.



### इंधन बचत आणि आरामदायी प्रवास

डिझेलवरील एसटी बसेसला ई-बसेस हा एक उत्तम आणि किफायतशीर पर्याय ठरणार आहे. या बसेसमुळे महामंडळाच्या

जाफराबाद आगारात नव्याने दाखल झालेल्या ई-बसेस आणि पाठीमागे उभारण्यात आलेले चार्जिंग स्टेशन.

इंधनावरील खर्चात मोठी बचत होईल, तसेच प्रवाशांना वातानुकूलित आणि प्रदूषणमुक्त प्रदूषणमुक्त प्रवासाचा लाभमिळेल, अशी माहिती आगार व्यवस्थापकांनी दिली आहे. ई-बसेस पूर्णपणे आवाजविरहित असल्याने आणि त्यामध्ये आरामदायी आसनव्यवस्था असल्याने नियमित प्रवास करणारे विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांनी या नव्या सुविधेबाबत समाधान व्यक्त केले आहे.

या नवीन ई-बसेसचे रीतसर उद्घाटन लवकरच पालकमंत्री आणि स्थानिक आमदारांच्या हसते.

### जाफराबाद झाले स्मार्ट

**बैलगाडीपासून एसटीच्या लाल डब्यापर्यंतचा प्रवास पाहिलेल्या जाफराबादने आता थेट इलेक्ट्रिक युगात उडी घेतली आहे. चार्जिंग पॉईंटचे निळे खांब आता आगाराची नवी ओळख बनले आहे**

**उद्घाटनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या बसेस प्रामुख्याने जाफराबाद-जालना आणि जाफराबाद-छत्रपती संभाजीनगर या मार्गांवर प्रवाशांच्या सेवेत रुजू होतील. या सुविधेमुळे आता ग्रामीण भागातील प्रवाशांना अत्याधुनिक बस**

### प्रवाशांमध्ये उत्साह

**रोज जालन्याला ये-जा करणारा विद्यार्थी अक्षय पवार याने सांगितले की, उन्हाळ्यात लाल डब्यात घामाच्या नद्या वाहायच्या. आता ई-बसच्या एसीत बसून शिमला फिरल्यासारखे वाटेल. इतर महाराष्ट्रातील बस स्थानकांमधून वातानुकूलित मी बसेस धावतात तशाच जाफराबाद आगारातून वातानुकूलित ही बसेस धावणार असल्याने प्रवाशांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, सदर बसला टेंभुर्णी बस स्थानकाला थांबा द्यावा ही प्रवाशांकडून मागणी होत आहे.**

**प्रवासी**
**विश्वनाथ सखाराम सांगळे**

---

# सिद्धार्थ महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनीची शासकीय सेवेत निवड

**दत्ता देशमुख**

जाफराबाद येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची विज्ञान शाखेची विद्यार्थिनी कु.प्राची सुनील मेढे हिची बॅक ऑफ बडोदाच्या प्रोबेशनरी ऑफिसर पदी निवड तर कु.निकिता सिताराम हिवाळे हिची पोलिस कॉन्सटेबल पदी निवड झाली आहे त्या निमित्ताने सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के यांच्या शुभहस्ते दोन्ही विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमा प्रसंगी बोलताना दादासाहेब म्हस्के म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सेवेसाठी



आमची संस्था व महाविद्यालय सदैव विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे.विद्यार्थांच्या सर्वप्रकारच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असल्याचेही सांगितले. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी महाराष्ट्रात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत हे ही दादासाहेबांनी बोलताना सांगितले.या कार्यक्रमा प्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ.सुनील मेढे, उपप्राचार्य प्रा विनोद हिवराळे, प्रा.पी व्ही राजपुत, प्रा.शिवाजी वैद्य श्री.संदीप जाधव, कौतिक पंडित, अशोक फदाट, साहेबराव संसारे,धनराज भिसे, दिलीप घुगे,कैलास पवार, विकास भापकर, आण्णासाहेब घोडके व महाविद्यालयातील शिक्षकेत्तर *(पान २ वर)*

---

# शिवराज्याभिषेक दिन स्वाभिमानाचा,शौर्याचा आणि सुसंस्कृतीचे जतन करणारा - दुर्गेश कठोठीवाले

## छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिवस ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयात साजरा

**जालना । प्रतिनिधी**

प्रारंभी ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे सचिव श्रीकांत शेलगांवकर व शिवसेना प्रतोद तथा नगरसेवक,जालना व म.न.पा. पाणी पुरवठा, शिक्षण व विद्युत समिती सदस्य दुर्गेश कठोठीवाले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीराम वाचनालयाचे अध्यक्ष कैलास बियाणी ,ब्राह्मण सभेचे उपाध्यक्ष रमेश देहडकर,साप्ताहिक स्वप्नभूमी



चे संपादक मिलिंद सावंत व नूतन माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक माधव ढाकणे,शाहीर बाबु सेवा राठोड याची उपस्थिती होती. मनोगत व्यक्त करताना दुर्गेश कठोठीवाले म्हणाले कि, ६ जून छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्यभिषेक दिन म्हणून साजरा करण्यात येतो हा फक्त शिवराज्यभिषेक दिन नसून स्वाभिमानाचा,शौर्याचा आणि सुसंस्कृतीचे जतन करणारा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींना एकत्र आणून स्वराज्याची स्थापना केली. शिवराज्याभिषेका नंतर शिवाजी महाराजांना छत्रपती ही पदवी बहाल झाली. शिवाजी महाराजांनी परकीयां सोबत गणिमीकावा असो किंवा समोरा-समोर युद्ध करून हिंदू धर्म टिकवण्याचे महान कार्य केले.

मनोगत व्यक्त करताना माधव ढाकणे म्हणाले कि, जगातले सर्व इतिहासकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या युध्द नितिचा अभ्यास करतात. हिंदवी स्वराज्यचा राजा घोषित करण्यसाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्यभिषेक सोहळा *(पान २ वर)*

---

# भोकरदन येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



**भोकरदन । प्रतिनिधी**

शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त भोकरदन येथे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने शिवप्रेंमीच्या उपस्थीतीत छत्रपती शिवाजी महाराज स्मारक भोकरदन येथे कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी छत्रपतींच्या प्रतिमेचे पुजन करुन छत्रपतींच्या नावाचा जयघोष करण्यात आला. सर्वप्रथम छत्रपतींच्या स्मारकाची स्वच्छता करण्यात आली व त्यानंतर प्रतिमापुजन करण्यात आले. यावेळी सुरेश पाटील तळेकर, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष विजय जंजाळ सचिव रामेश्वर सोनवणे , नगराध्यक्ष समीम मिर्झा,कॉग्रेसचे ता.अध्यक्ष त्रिंबक पाबळे, नगरसेवकशफिक पठाण,कदिर बापु, मुकेश चिने, नसीब पठाण, राजेंद्र देशमुख, मा.सैनिक बबन शिंदे, वामन जंजाळ,सोपान सपकाळ सर, ता.प्रसिद्धीप्रमुख अप्पासाहेब जाधव, शेतकरी संघटनेचे ता.अध्यक्ष काकासाहेब साबळे, कॉग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष राहुल देशमुख, मदत फाऊंडेशनचे अध्यक्ष दिनेश पडोळ, कृष्णा जंजाळ , भगवान देठे, विजय साबळे, पत्रकार रमेश इंगळे, युवराज पगारे, पांडूरंग लोखंडे, राजु तळेकर, मिसाळ, जगदिश गायकवाड, समाधान तळेकर आदींसह शिवप्रेमींची उपस्थीती होती.

---

# टेंभुर्णीचा अर्जुनची भारतीय सैन्यात निवड युगंधर प्रतिष्ठानकडून सत्कार

**दत्ता देशमुख**

सेवा परमो धर्म हा मंत्र घेऊन टेंभुर्णीचा अर्जुन पुंजाराम जोशी भारतीय सैन्यदलात दाखल होत आहे. ही बातमी गावात समजताच एकच जल्लोष झाला. युगंधर प्रतिष्ठानने कसलाही वेळ न दवडता थेट अर्जुनच्या दारात जाऊन ढोल-ताशांच्या गजरात त्याचा सत्कार घडवून आणला. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि गावकऱ्यांच्या

टाळ्यांच्या कडकडाटात अर्जुनचा फौजी अवतार टेंभुर्णीकरांनी डोळे भरून पाहिला.

सत्काराला उत्तर देताना



अर्जुनचे वडील पुंजाराम जोशी यांच्या डोळ्यात अभिमानाचे अश्रू तरळले. माझं जे राहिलं, ते माझ्या पोरानं केलं, आता माझा अर्जुन फक्त जोशींचा नाही, तर पूर्ण हिंदुस्थानचा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

सकाळी पाच वाजता उठून धावणे, व्यायाम आणि अभ्यास अशी अर्जुनची दिनचर्या गेली....

### गावचे ऋण फेडण्याची वेळ

''गावच्या मातीचे ऋण फेडायची वेळ आली आहे. सीमेवर उभा राहून जेव्हा भारत माता की जय बोलेन, तेव्हा टेंभुर्णीचे नाव आठवेल. हे यश माझे एकट्याचे नाही, तर माझ्या मित्रांचे, गुरुजींचे आणि या मातीचे आहे.'' - अर्जुन जोशी, भारतीय सैनिक

.....तीन वर्षे ठरलेली होती. त्याला मोबाईल गेम आणि रीलचे वेड नव्हते, फक्त वर्दी अंगावर चढवण्याचा ध्यास होता, असे त्याचा मित्र सुमित जोशी याने सांगितले. आजकालची तरुण मुले नोकरीसाठी पुणे-मुंबईकडे धावतात, पण अर्जुनने देशासाठी धावण्याचा निर्णय घेतला. हा सत्कार फक्त अर्जुनचा नाही, तर टेंभुर्णीच्या संस्कारांचा आहे, अशी भावना युगंधर *(पान २ वर)*

---

# राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय यशस्वी सिलंबम खेळाडूंकडून शिवरायांना मानवंदना; शिवतीर्थावर पारंपरिक युद्धकलेचे भव्य दर्शन








**जालना । प्रतिनिधी**

अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त देवगिरी इंग्लिश स्कूल, जालना व जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवतीर्थ, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे भव्य मर्दानी खेळ व सिलंबम प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन व देवगिरी इंग्लिश स्कूलच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व सिलंबम खेळाडूंनी आपल्या पारंपरिक शस्त्रकलेचे प्रभावी सादरीकरण करत विविध युद्धमुद्रा धारण केल्या आणि आपल्या आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना अर्पण केली. शिवतीर्थ परिसर ''जय भवानी, जय शिवाजी'' च्या घोषणांनी दुमदुमून गेले.

सिलंबम ही भारतातील प्राचीन युद्धकला असून शौर्य, शिस्त, आत्मसंरक्षण आणि राष्ट्रभक्तीचे संस्कार देणारी कला म्हणून ओळखली जाते. आधुनिक काळात युवकांना भारतीय संस्कृती, मर्दानी परंपरा आणि शारीरिक तंदुरुस्तीशी जोडण्याचे कार्य सिलंबमच्या माध्यमातून होत असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

विशेष म्हणजे, जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशनच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले असून अनेक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये स्थान निश्चित केले आहे. त्यामुळे सिलंबम ही केवळ एक कला नसून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा आणि महाराष्ट्राचा झेंडा उंचावणारी युद्धक्रीडा *(पान २ वर)*

---

# सिद्धार्थ महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनीची शासकीय सेवेत निवड

**जाफराबाद । प्रतिनिधी**

जाफराबाद येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची विज्ञान शाखेची विद्यार्थिनी कु.प्राची सुनील मेढे हिची बॅक ऑफ बडोदाच्या प्रोबेशनरी ऑफिसर पदी निवड तर कु.निकिता सिताराम हिवाळे हिची पोलिस कॉन्सटेबल पदी निवड झाली आहे त्या निमित्ताने सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के यांच्या शुभहस्ते दोन्ही विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमा प्रसंगी बोलताना दादासाहेब म्हस्के म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सेवेसाठी आमची संस्था व महाविद्यालय सदैव विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे.विद्यार्थांच्या सर्वप्रकारच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असल्याचेही सांगितले.आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी महाराष्ट्रात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत हे ही दादासाहेबांनी बोलताना सांगितले.या कार्यक्रमा प्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ.सुनील मेढे, उपप्राचार्य प्रा विनोद हिवराळे,प्रा.पी व्ही राजपुत,प्रा.शिवाजी वैद्य श्री.संदीप जाधव, कौतिक पंडित, अशोक फदाट, साहेबराव संसारे,धनराज भिसे, दिलीप घुगे,कैलास पवार,विकास भापकर, आण्णासाहेब घोडके व महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी बंधु-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.